An International Multidisciplinary Research Journal



Rayat Shikshan Sanstha's

# Arts and Commerce College, Pusegaon

One Day U. G. C. Sponsored

# Interdisciplinary National Seminar

20th January 2014

On

# "Position and Impact of Regional Political Parties in Indian Democracy : A Critical Study"

**Published by**

**Prin. Dr. K. H. Shinde**

Arts & Commerce College, Pusegaon.

**Chief Editor**

**Mr. R. V. Kumbhar**

Assistant Professor in History,

Arts and Commerce College, Pusegaon

**Co – Editor**

**Sou. C. B. Sakate**

Assistant Professor in Political Science,

Arts and Commerce College, Pusegaon

Prof. Kumbhar R. V.
Personal Library
No.:

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | प्रा. एच्. एस्. कुचेकर | |
| 24. | प्रादेशिक पक्षांचा राजकारणातील वाढता प्रभाव व त्याचे परिणाम<br>डॉ . विक्रम पाटील | 96 |
| 25. | प्रादेशिक पक्ष व राष्ट्रीय एकात्मता<br>प्रा . डॉ . मेजर धनवट मोहन रामचंद्र | 100 |
| 26. | **आघाडी सरकार व प्रादेशिक पक्ष**<br>प्रा. मोहन गणपती हजारे | 104 |
| 27. | प्रादेशिक राजकीय पक्षांची ध्येयधोरणे व राष्ट्रीय एकात्मता<br>श्री.काटकांबळे नामदेव तुकाराम | 108 |
| 28. | भारतातील प्रादेशिक पक्षांच्या उदयाची कारणे व परिणाम<br>* पाटील पां . वि . | 113 |
| 29. | भारतातील प्रादेशिक पक्षांचा उदय व विकास<br>प्रा . रावसाहेब सटवा कांबळे | 117 |
| 30. | " भारतातील प्रादेशिक पक्ष व प्रादेशिक पक्षाच्या उदयाची कारणे "<br>प्रा.श्रीरंग बाबूराव पाटील | 121 |
| 31. | प्रादेशिक पक्ष व राष्ट्रीय एकात्मता<br>प्रा . अशोक शेलार, | 124 |
| 32. | भारतीय राजकीय पक्ष पध्दती आणि जनतेच्या अपेक्षा<br>प्रा.श्री.कठरे धनाजी नारायण | 130 |
| 32. | भारतीय लोकशाहीतील प्रादेशिक पक्ष आणि आघाडयांचे राजकारण<br>प्रा. ए.बी.जाधव | 133 |
| 33. | भारतातील प्रादेशिक पक्षाच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी<br>प्रा. थोरात आर. एन. | 140 |
| 34. | "स्वाभिमानी शेतकरी संघटना एक प्रादेशिक पक्ष"<br>प्रा. दमयंती नलवडे | 143 |
| 35. | महाराष्ट्रातील निवडक प्रादेशिक पक्षांच्या कार्याचा मागोवा : स्थापना ते सन २००० <br>श्री. माने विवेकानंद राजाराम | 147 |
| 36. | Are Regional Parties a threat to National Integrity?<br>Miss. Barge Swati Chandrakant | 151 |
| 37. | भारतातील प्रादेशिक पक्ष आणि राष्ट्रीय एकात्मता<br>प्रा. दत्तात्रय मारूती काळेल | 156 |
| 38. | भारतीय राजकारण व प्रादेशिक पक्षाची भूमिका<br>सागरकुमार विठ्ठल जाधव | 159 |
| 39. | **भारतीय राजकारणाचे संघराज्यीयकरण करण्यात प्रादेशिक पक्षांची भूमिका**<br>प्रा . अंकुश पांगजी आवारे, | 164 |
| 40. | भारतीय लोकशाही व प्रादेशिक पक्ष<br>प्रा. सौ. सकटे सी. बी. | 170 |
| 41. | महाराष्ट्रातील शेकापचे यशापयश<br>प्रा . निकम विकास तायाप्पा, प्रा . अन्नापुरे साहेबराव गंगाराम | 174 |
| 42. | स्थानिक राजकीय पक्षासमोरील आव्हाने<br>डॉ. अजितानंद जाधव, इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा. | 176 |


Scanned by CamScanner

ISSN : 2320-6446

# भारतातील प्रादेशिक पक्षांच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**प्रा. थोरात आर. एन.**
एम.जे.एस.कॉलेज, श्रीगोंदा
जि. अहमदनगर
मो.नं. ९४२०६६६९९०

भारताच्या राजकारणात दिर्घकाळ कॉंग्रेस हा मध्यवर्ती पक्ष होता. त्यातूनच 'कॉंग्रेस व्यवस्था' हे भारताच्या राजकीय प्रक्रियेचे वर्णन प्रचलीत आहे. कॉंग्रेसच्या या मध्यवर्ती स्थानाला १९८९ नंतर धक्का बसला आणि वारंवार बहुपक्षीय सरकारे सत्तेवर आले. कॉंग्रेसच्या या उतरत्या कळेमुळे पुर्वी जे घटक राजकीय प्रक्रियेत क्षीण होते. त्याचे महत्त्व वाढले. याच काळात नव्या सामाजिक शक्तीही राजकीय दृष्टया उदयाला आल्या. या बदलांमुळे राजकीय प्रक्रियेत दोन घटक मध्यवर्ती बनले ते म्हणजे प्रादेशिक पक्ष व जातींवर आधारीत राजकारण नव्या रूपात हे घटक क्रियाशिल झाले आहेत. भारतातील उदयास आलेल्या बहुतेक पक्षांनी जातीचे राजकारण केल्याचे दिसून येते.

प्रादेशिक पक्ष हा शब्दप्रयोग मर्यादीत अर्थाने वापरला जातो. प्रादेशिक पक्ष प्रदेशवादी अभिमानाचा पाठपुरावा करतात. या पक्षाची कार्यक्षमता बऱ्याचवेळा प्रदेशापुरती मर्यादीत असते. प्रादेशिक पक्ष वैचारिक भूमिकांचा पाठपुरावा करीत असतात. ते प्रादेशिक प्रश्नांना महत्त्व देतात. भावनिक मागण्यांच्या आधारे लोकांमध्ये पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न करतात. प्रदेशाचा इतिहास, संस्कृती भाषा यांना प्रादेशिक पक्षांच्या राजकीय भूमिकेत महत्त्वाचे स्थान असते.

१९७७ पूर्वी अनेक प्रादेशिक पक्ष उदयास आले. परंतु त्यांचा राज्यात प्रभाव असला तरी राष्ट्रीय राजकारणात त्यांचा तेवढा प्रभाव नव्हता. १९५२ मध्ये प्रादेशिक पक्षांचे ३५ खासदार होते. १९५७ मध्ये ३४ खासदार, १९६२ मध्ये १३ खासदार, १९६७ मध्ये ३६, १९५१ मध्ये ५१ पर्यंत खासदारांची संख्या वाढली. १९७७ नंतर प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढतच गेले. १९७७ मध्ये जनता पक्ष सरकारमध्ये दोन प्रादेशिक पक्ष होते. १९८९ पासून प्रादेशिक पक्षांना इतके महत्त्व आले की, त्यांच्या शिवाय केंद्रातील सरकार सत्तेत राहू शकणार नाही. केंद्रातील सरकार अस्तित्वात आणणे, टिकविने किंवा पाडणे हे प्रादेशिक पक्षांवर अवलंबून राहू लागले.

१९८४ च्या लोकसभेत ७६ खासदार निवडून आले. १९९१ मध्ये लोकसभेत ५६ खासदार निवडून आले. १९९६ मध्ये १३७ खासदार, १९९८ मध्ये १६१ खासदार, १९९९ मध्ये १८८ खासदार प्रादेशिक पक्षांचे हाते. १९८४ पासून लोकसभेच्या ज्या निवडणूका झाल्या त्या निवडणूकांमध्ये प्रादेशिक पक्षांची मतदानाची टक्केवारी मोठी होती. १९८४ मध्ये ११.२%, १९८९ मध्ये ९.७%, १९९१ मध्ये ९.६%, १९९६ मध्ये १८.५%, १९९८ मध्ये २९.८%, १९९९ मध्ये ३०.९%, २००४ मध्ये ३१.३% तर २००९ मध्ये २८.८% इतकी प्रादेशिक पक्षांच्या मतांची टक्केवारी वाढत गेली. प्रादेशिक पक्षांची संख्याही वाढत गेली त्यामुळे देशाच्या राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढत गेले आणि यापुढील सरकारे आघाडीचीच राहतील असा १९८९ च्या परिस्थितीहून निदर्शनास येते.

**भारतातील प्रादेशिक पक्षांच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी खालील मुद्दयांच्या आधारे पाहता येईल.**

भाषिक, धार्मिक व सांस्कृतीक विविधता हे प्रादेशिक पक्षांच्या उदयाचे महत्त्वाचे कारण मानता येईल. भारत हा भाषा, धर्म, संस्कृती, वंश आणि प्रदेश अशा बाबतीत विविधता असणारा देश आहे. एवढी विविधता असणाऱ्या प्रदेशातील लोकांमध्ये प्रादेशिक अस्मिता असल्यामुळे या प्रदेशात प्रादेशिक पक्षांचा उदय होतो. अकाली दल. नॅशनल कॉन्फरन्स, आसाम गण परिषद, शिवसेना, मनिपूर पीपल्स पार्टी इत्यादी पक्षांचा उदय हा भाषिक, धार्मिक व सांस्कृतीक अस्मितेतून



Scanned by CamScanner

ISSN : 2320-6446

झाले आहे. अकाली दल हा पंजाबच्या राजकारणात १९६६ पासून मध्यवर्ती आहे हा पक्ष संपूर्ण राज्यात पसरलेला आहे. हा पक्ष प्रादेशिकतेबद्दल बोलतो. तसेच शीख पंथाबद्दलही बोलतो व प्रत्यक्ष--अप्रत्यक्षपणे पंजाबी प्रादेशिकतेची व्याख्या धर्माच्या संदर्भात करू पाहते.

महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाची स्थापना झाल्यानंतर या पक्षानेही भाषिक व धार्मिक आधार घेऊन राजकारण केले हिंदुत्ववादाचा नारा पुकारला सुरुवातीला मुंबईत व नंतर महाराष्ट्रात आपल्या पक्षाची पाळेमुळे घट्ट केली आज हा पक्ष महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष ठरला आहे. हा पक्ष धार्मिक आवाहन करून मतपेटी बळकट करताना दिसतो. वरील सर्व पक्षांचा उदय भाषिक व धार्मिक अस्मितेतून झाल्याचे दिसून येते.

अनेक राजकीय पक्ष वेळोवेळी सांस्कृतिक प्रदेशवाद आणि स्वायत्ततेची भूमिका यांची सांगड घालतात. त्यामुळे नॅशनल कॉन्फरन्स, अकाली दल, द्रमुक हे या पक्षांची भूमिका भारतीय लोकशाहीत वादग्रस्त ठरली. नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख शेख अब्दुल्ला यांनी काश्मीरच्या विलीनीकरणास पाठींबा दिला. परंतु पुढे ते बदलले आणि १९५३ पासून स्वतंत्र काश्मिरची भाषा बोलू लागले. तमिळनाडूमधील प्रमुख सरकारे एकेकाळी तामिळींच्या अस्मितेचा मुद्दा उचलून धरला. पंजाबातील अकाली दलांनी फुटीरवादी शक्तींना पाठबळ दिले. त्यामुळे तेथे खालिस्तानची मागणी वळावत गेली.

काही राजकीय पक्षांचा उदय विकासातील असमतोलपणामुळे झालेला दिसून येतो. असमतोलपणामुळे अविकसित भागातील लोकांमध्ये जो असंतोष आहे तयातून काही प्रादेशिक पक्षंची निर्मिती झालेली आढळून येते विशेषत: आदिवासी प्रदेश, डोंगराळ प्रदेश अशा भागात विकासाचे प्रश्न निर्माण झालेले दिसतात. झारखंड मुक्ती मोर्चा, उत्तराखंड, क्रांतीदल, मिझो नॅशनल फ्रंट, तेलंगणा संघर्ष समिती इत्यादी उदाहरणे सांगता येतील. तेलंगणा हा आंध्र प्रदेशातील भाग परंतु हा प्रदेश दुर्लक्षित राहिल्यामुळे चंद्रशेखरराव यांनी तेलंगणा संघर्ष समिती स्थापन करून स्वतंत्र तेलंगनाची मागणी लावून धरली. त्यासाठी मोर्चे, उपोषण या मार्गाचा अवलंब केला. राजकीय पक्षामार्फत तेलंगणात आपल्या पक्षाला प्रचंड यश मिळवून दिले. म्हणून कॉंग्रेस आघाडी सरकारने स्वतंत्र तेलंगणाची घोषणा केली. मागासलेपणाचा मुद्दा उपस्थित करून शिबू सोरेन यांनी झारखंड मुक्ती मोर्चा स्थापन केला. या प्रादेशिक पक्षानेही केंद्र व राज्यात आपल्या पक्षाचा प्रभाव निर्माण केला.

प्रादेशिक पक्षांच्या उदयाला जातिभेदाचेही राजकारण कारणीभूत मानावे लागेल. समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, बहुजन समाज पक्ष यांना राष्ट्रीय पक्षांची मान्यता असली तरी ते प्रदेशापुरतेच मर्यादीत आहे हे पक्ष दलित, ओबीसी अशी आपली छबी उभारण्याचा सातत्याने प्रयत्न करताना दिसतात हे पहिले दोन यादवांचे पक्ष म्हणून ओळखले जातात. समाजवादी पक्षाला यादवांचा मोठा पाठींबा मिळत असला तरी त्यांच्या मतदारांपैकी ३८ टक्के हे बिगर यादव ओबीसी आहेत मायावतींच्या बहुजन समाज पक्षाला दलितांचा पाठींबा मिळत असल्यामुळे या पक्षांना दलितांचा तेवढा पाठींबा मिळत नाही. महाराष्ट्रात डॉ. आंबेडकरांनी शेडयूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची स्थापना केली. स्वातंत्र्यानंतरचा सत्तासंघर्ष हा दलित व उच्च जाती यांच्यात असेल व त्यासाठी दलितांचे संघटन असावे ही आंबेडकर यांची कल्पना होती अनेक राज्यात जातीयवादी भूमिकेतून छोटे–छोटे राजकीय पक्ष उदयास आले. जातीयवादी म्हणून ओळखत असले तरी विकासाची भूमिका घेतल्याशिवाय अस्तित्त्व रहात नाही.

प्रदेशाभिमान हेही प्रादेशिक पक्षाच्या उदयाला कारणीभूत ठरलेला महत्त्वाचा घटक आहे. आंध्रच्या संदर्भात श्रीनिवासुलु यांनी असा युक्तीवाद केला की, हरितक्रांती नंतर उदयास अलेल्या श्रीमंत शेतकरीवर्गाला प्रादेशिक अभिमानाचा मुद्दा आकर्षक वाटला व त्यामुळे तेलगू देशमला आंध्रात पाय रोवणे शक्य झाले. महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष प्रदेशाभिमानाचा पुरस्कार करणारा आहे तसेच इतरही अनेक पक्ष भारतात प्रदेशाभिमानाचा पुरस्कार करणारे आहेत.



Scanned by CamScanner

ISSN : 2320-6446

काही प्रादेशिक राजकीय पक्षांचा उदय नवोदित बहुजन जातीचे राजकारण यांच्या संबंधातून झाल्याचे दिसून येते. प्रादेशिक पक्षांचा सामाजिक आधार हा कनिष्ट व कनिष्ट मध्यम मानलेल्या जातींमध्ये आढळतो. दलित व ओबीसी जातीचा सहभाग हे लोकशाहीकरणाचे एकम अंग असल्याने प्रादेशिक पक्ष हे लोकशाहीचे वाहक ठरतात. काँग्रेसने ज्या समाजघटकांच्या प्रतिनिधीत्वाची गंभीरपणे दखल घेतली नाही ते पर्यायाच्या शोधात प्रादेशिक पक्षाला वळले. भारतीय जनता पक्षानेही १९९८ पर्यंत ज्या समाजधारकांची दखल घेतली नव्हती त्यामुळे राजद समाजवादी पक्षांच्या उदयाला अनुकूल स्थिती निर्माण झाली.

राजकीय पक्षांची फाटाफुट हेही प्रादेशिक पक्षांच्या उदयाचे कारण ठरले. बऱ्याच वेळा मोठया राष्ट्रीय पक्षात महत्वकांक्षी लोक आपल्या कर्तृत्वाने उच्च पदापर्यंत जावून पोहचतात परंतु पक्षांमध्ये मतभेद निर्माण झाले की ते पक्ष सोडता व नविन पक्षाची स्थापना करतात. कॉंग्रेसमधून फुटून के करूणाकरण यांनी केरळ कॉंग्रेस, ममता बॅनर्जी यांनी तृणमुल कॉंग्रेस, शरद पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना केली. जनता दलातून फुटून राष्ट्रीय जनता दल, (बिहार) समता पार्टी (बिहार) बिजू जनता दल (ओरिसा) इंडियन नॅशनल लोकदल असे प्रादेशिक पक्ष निर्माण झाले. तामिळनाडूमध्येही द्रमुक पक्षात फुटपडून अण्णा द्रमुक, एम.डी.एम.के असे पक्ष निर्माण झाले. कर्नाटकात भाजपामध्ये फुट पडून येडीयुरप्पा यांनी कर्नाटकात प्रादेशिक पक्ष स्थापन केला हे पक्ष सामाजिक, आर्थिक प्रश्न हातात घेऊन विकासाभिमुख राजकारणात करताना दिसतात.

प्रादेशिक समस्यांतुनही प्रादेशिक राजकीय पक्षांचा उदय झाल्याची उदाहरणेही आहेत. मुंबईच्या मराठी माणसांना न्याय देण्यासाठी शिवसेना या राजकीय पक्षाची स्थापना झाली. आसाममध्ये पश्चिम बंगाल आणि बांगलादेश येथून बंगाली लोकांचे सतत होत राहीलेले आणि त्यांचे अनेक क्षेत्रात निर्माण झालेले वर्चस्व याबद्दल आसामी लोकांमध्ये असंतोष होता. त्यातूनच आसाम गण परिषद या राजकीय पक्षाचा उदय झाला.

राजकीय पक्षाच्या उदयाला वरील वेगवेगळी कारणे कारणीभूत आहेत. राजकीय पक्षांनी पक्ष स्थापन केल्यानंतर त्यांना सामान्यांचे प्रश्न हाती घ्यावे लागतात शेती, विज, पाणी, जातीय प्रश्न हातात घेऊन विकासाचे राजकारण करून प्रश्न सोडवावे लागतात. प्रश्न सोडवून ते आपला पाया भक्कम करतात. राजकीय पक्षही लोकशाहीची अपरिहार्यता आहे हे लोकशाहीपुढील आव्हान नसून त्याची गरज आहे. त्यामुळे लोकशाही बळकट होईल यापुढेही अनेक प्रश्न हाती घेऊन राजकीय पक्षांचा उदय होईल आणि तेही विकासाचे राजकारण करतील. अनेक राजकीय पक्ष केंद्रातही आपला प्रभाव निर्माण करतील. त्यातून आघाडीचे राजकारण चालु राहिल असे मानन्यास हरकत नाही.

संदर्भ ग्रंथ

१) बाळ । बेडकिहाळ (२००२) भारतीय राजकीय व्यवस्था, न्यू.एज प्रिंटिंग प्रेस मुंबई २५.
२) तांबोळी एन.एस. (२००९) आधुनिक भारत, निराली प्रकाशन, पुणे ०५.
३) पवार । बिरमल (२०१३) भारतीय शासन व राजकारण, डायमंड पब्लीकेशन्स पुणे ३०.
४) मुठाळ राम (२००४) भारतीय शासन आणि राजकारण, अंधुल प्रकाशन नागपूर ९.
५) वराडकर र.घ. (२००९) भारतातील घटनात्मक व राजकीय प्रक्रिया, निराली प्रकाशन पुणे ०५.



Scanned by CamScanner